Rediffusion/Edelman

| Published Date: | 22 Nov 2017 | Publication: | Punya Nagari (Marathi) |
|---|---|---|---|
| Edition: | Mumbai | Page No: | 1 |
| Circulation: | 25000 | | |

## गोपी बिर्ला मेमोरियल स्कूल विजयी

। मुंबई : शालेय विद्यार्थ्यांसाठी असलेली सर्वात मोठी प्रश्नमंजुषा म्हणजेच टीसीएस आयटी प्रश्नमंजुषा ही माहिती तंत्रज्ञान सेवा, सल्लागार आणि व्यवसायांसाठी उपाययोजना प्रदान करणारी आघाडीची कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसमार्फत आयोजित केली जाते. या प्रश्नमंजुषेच्या मुंबई पर्वाला विविध शाळांमधील असंख्य विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मुंबईतील वांद्रे रेक्लेमेशन येथील इंडियन एज्युकेशन सोसायटीच्या माणिक सभागृहात रंगलेल्या या प्रश्नमंजुषेत जवळपास १०५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. मुंबई रंगलेल्या या वर्षीच्या प्रश्नमंजुषेसाठी नाशिकमधील काही शाळांनी सहभाग घेतला होता. प्रादेशिक अंतिम फेरीतील चुरशीच्या झालेल्या पाच फेऱ्यांनंतर गोपी बिर्ला मेमोरियल स्कूलच्या भाव्या शाह आणि आदित रांभिया यांनी विजेतेपदाला गवसणी घातली. तसेच मुंबईतील श्रीमती सुलोचना सिंघानिया शाळेच्या सोहम रॉय आणि अद्वैत पै यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. विजेत्या संघाला आता मुंबईत रंगणाऱ्या राष्ट्रीय अंतिम फेरीत आपल्या शहराचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळणार आहे.